प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ६०/२०१९ दिनांक २६/०७/२०१९ कालावधी ५ दिवस

डॉ. अशोककुमार चव्हाण,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

डॉ. विजय मोरे,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०७/२०१९ ते २६/०७/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०७/२०१९ सकाळी ८:३० पासून ३१/०७/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/०७ | २१/०७ | २२/०७ | २३/०७ | २४/०७ | २५/०७ | २६/०७ | | २७/०७ | २८/०७ | २९/०७ | ३०/०७ | ३१/०७ |
| ४०.० | ४.० | १३.६ | १०३.० | १३७.८ | १३४.८ | ५२.६ | पाऊस (मिमी) | ७० | ५० | ५० | ४० | ३५ |
| ३०.२ | ३०.४ | ३०.० | ३०.५ | २९.० | २७.० | २६.१ | कमाल तापमान (अं.से) | २९ | २८ | २९ | ३० | ३० |
| २४.५ | २४.० | २४.५ | २३.० | २४.० | २४.० | २४.५ | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २५ | २५ | २५ |
| ४ | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ७ | ५ |
| ९७ | ९० | ९३ | १०० | ९८ | ९८ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९३ | ९३ | ९३ | ९२ | ९१ |
| ७८ | ९० | ८१ | ८८ | ९८ | ९८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८८ | ९१ | ८६ | ८३ | ८० |
| २.९ | १.९ | ३.८ | ५.५ | ६.५ | ४.५ | २.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १५ | १६ | १४ | १६ | १६ |
| नै. | नै. | शांत | प. | शांत | प. | प. | वाऱ्याची दिशा | नै.प. | द. | द. | प. | वा.प. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ४८५.८ | १९७८.५ | ३०७१.८ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २७ ते ३१ जुलै, २०१९ पर्यंत जास्त पाऊसाची शक्यता असून वाऱ्याचा वेगात वाढ संभवते.**

**दिनांक २६ जुलै ते १ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुटवे अवस्था | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने भात खाचरातील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात देण्यात यावा. **टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना खते दयावीत. |
| नागली (नाचणी) | रोप अवस्था | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने नागली पिक क्षेत्रातील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे. |
| आंबा | वाढीची अवस्था | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने आंबा बागेत पॅक्लोब्युट्राझोलची आळवणी पुढे ढकलावी. |
| नारळ व सुपारी | - | • पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने नारळ आणि सुपारी बागेतील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे. |
| भाजीपाला पिके | वाढीची अवस्था | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने भाजीपाला क्षेत्रातील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• वांगी, मिरची, कारली, पडवळ, दुधीभोपळा, काकडी, दोडका भाजीपाला पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन २० मिली किंवा डायमिथोएट १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. **टिप:** पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी तसेच पाऊसामध्ये कीटकनाशक पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर मिश्रणात मिसळून फवारणी करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून संरक्षण करावे.<br>• सर्वसाधारण एका शेळीस २०० ते २५० ग्रॅम खुराक, ३ ते ४ किलो हिरवी वैरण आणि १.५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे पक्षाच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढील चार- सहा आठवड्यांपर्यंत ब्रॉयलर फिनिशर खादय दयावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**